# महाराष्ट्र ॲक्युपंक्चर परिषद, मुंबई
# Maharashtra Council of Acupuncture

202, 2nd Floor, Administrative/ Superintendent office Bldg,
Cama and Albless Hospital, Mahapalika Marg, Mumbai 400 001
Tel. : 022-22620376 | Email : mahacucouncil@gmail.com | Web : www.mahacucouncil.org

जा.क्र.मअॅप/नियुक्त अध्यापक/ ०२९ /२०२५ दिनांक : २१/०१/२०२५

## परिपत्रक

विषय : महाराष्ट्र ॲक्यूपंक्चर परिषदेतर्फे मान्यता प्रदान केलेल्या संस्थांमध्ये नियुक्त केलेल्या अध्यापकांबाबत . .

महाराष्ट्र ॲक्यूपंक्चर परिषदेतर्फे राज्यात ॲक्यूपंक्चर पदविका अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी काही संस्थांना मान्यता देण्यात आलेली आहे. सदर मान्यता संबंधीत संस्थांनी प्रस्तावामध्ये परिषदेस सादर केलेल्या मुलभुत सोयीसुवीधा, अध्यापक व कर्मचारी, साधन सामुग्री, प्रयोगशाळा व अन्य माहीतीच्या आधारे देण्यात आलेली आहे.

परिषदेच्या असे निदर्शनास आणण्यात आले आहे की, काही संस्थांमध्ये मान्यतेच्या वेळी नियुक्ती दर्शविलेले अध्यापक/प्राचार्य प्रत्यक्षात उपलब्ध नसुन अन्य व्यक्ती प्राचार्य/अध्यापक म्हणुन कार्यरत आहेत. ही बाब नियम बाह्य आहे. अशा प्रकारे कोणतेही बदल करावयाचे झाल्यास त्यास परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे. या संदर्भात काही अध्यापकांकडून त्यांना संस्थेने दर्शविलेल्या प्राचार्य / उपप्राचार्य / पाठ्य निर्देशक या पदावर संबंधीत संस्थांनी प्रत्यक्षात नियुक्ती दिली नसल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

परिषदेच्या मान्यतेशिवाय अशा प्रकारचे बदल करणे ही गंभीर बाब असुन सदर बदल परिषदेतर्फे अमान्य करण्यात येतील व संबंधित संस्था विरोधात नियमानुसार योग्य ती कारवाई करण्यात येईल, याची नोंद सर्व संस्था प्रमुखांनी घ्यावी.

(नारायण नवले)
प्रबंधक,
महाराष्ट्र ॲक्यूपंक्चर परिषद, मुंबई